# ' तुम्ही सुखी तर तुमचे कुटुंब सुखी'

## पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांचे मत



**पुणे : प्रतिनिधी**

हेल्मेट सुरक्षिततेसाठी आहे. नागरिकांनी हेल्मेटचा नियमित वापर करावा. तुम्ही सुखी तर तुमचे कुटुंब सुखी राहील, असे मत व्यक्त करीत पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी पुणेकरांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले. याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रविवारी (दि. १५ जानेवारी) दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे पोलीस वाहतूक विभागाच्या वतीने २८ वा रस्ता सुरक्षा अभियान २०१७ राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी सहआयुक्त सुनील रामानंद, फिनोलेक्स कंपनीच्या संचालिका रितू छाब्रिया, गल्फ कंपनीचे विनायक जोशी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत येत्या रविवारी दि. १५ जानेवारीला दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली ३६ किलोमीटरची असल्याचे वाहतूक विभागाच्या वतीने सांगण्यात आले. त्यामध्ये हेल्मेट परिधान करून एक हजार नागरिक, पोलीस आणि दुचाकी रायडर सहभागी होणार आहेत. यावेळी फिनोलेक्स आणि गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्सच्या वतीने पोलीस अधिकाऱ्यांना हेल्मेट्स आणि मास्कचे वाटप करण्यात येणार आहे.

**अशी निघणार रॅली**

### शहरात जनजागृती

रस्ता सुरक्षा अभियानात आपण सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित, रस्त्यावर सावध रहा' या घोषवाक्यांद्वारे विविध पद्धतीने शहरात जनजागृती करण्यात येत आहे.

रॅलीची सुरुवात शिवाजीनगर मुख्यालयातून सकाळी सात वाजता होणार आहे. मुख्यालयातून डावीकडे वळून वीर चाफेकर, सूर्यमुखी चौक, पुणे विद्यापीठ चौकातून सरळ ब्रेमन चौकातून औंध रोडने स्पायसर कॉलेज, आंबेडकर चौक, साई चौक, चर्च अंडरपास येथून डावीकडे वळून सरळ जुना पुणे- मुंबई रोडने पोल्ट्री चौक, मुळा रोडवरून होळकर ब्रीज, सादलबाबा चौक, गुंजन चौक, रामवाडी, फिनिक्स मॉल येथून यूटर्न घेऊन कल्याणीनगर जंक्शन, एबीसी चौक, कोरेगाव पार्क, ब्ल्यू डायमंड चौक, साधू वासवानी ब्रीजवरून सर्किट हाऊस, भैरोबानाला, सोलापूर बाजार चौकी, धोबी घाट, स्वारगेट जेधे चौक, सारसबाग, टिळक रोडने गांजवे चौक, सेनादत्त चौकी, म्हात्रे ब्रीज, नळस्टॉप, कर्वे रोडने सरळ खंडूजीबाबा चौक, फर्ग्युसन रोड, तुकाराम पादुका चौकातून सरळ चाफेकर चौक पुलाखालून सिमला चौकातून यूटर्न घेऊन पुन्हा शिवाजीनगर मुख्यालयात रॅलीचा समारोप होणार आहे.